# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०८/०८/२०१९
## दि.०७/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३१९/१९,भादविक ३९९,४०२,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | पो.हवा. एस.जी.पागार, बंडगार्डन पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.सौ-या उर्फ सौरभ तिमप्पा धनगर,वय-१९,रा.ताडीवाला रोड,पुणे २.वसीम अब्दुल सत्तार शेख,वय-१९,रा.गल्ली नं.१४,पुणे ३.राजु व्यंकटेश्वर,वय-२१,रा.मालधक्का चौक,पुणे (अटक) व त्याचे तीन साथीदार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/४५ वा. पुणे आरटीओ ऑफीस जवळील संगम घाटाचे खाली नदिपात्रात असलेल्या मारूती मंदिरा जवळ पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे कोयता, पिस्तल सारखे दिसणारे लायटर, चाकु, मिरची पुड व नायलॉन दोरी इत्यादी घातक शस्त्रे बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचेतयारीत असताना मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.ए.जमदाडे ९८२२०३०७६९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ४४२/१९,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | सहा.पो.फौज. अनिल माने, सहकारनगर पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | एकुण तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०८/२०१९ रोजी ११/४५ वा. विंन्डसर टॉवर,वाळवेकर लॉन्स जवळ,सातारा रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सेफ्टी इन्चार्ज व ठेकेदार यांनी त्यांचे पुणे येथील नमुद ठिकाणी बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना, कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील बिगारी कामगार अर्जुन निशाद उर्फ अर्जुन सिंग कैवर्त्य,वय-३४,रा.आमगाव,राज्य छत्तीसगड हा इमारतीचे मजल्यावर काम करीत असताना,तो वरून खाली पडुन,त्यामध्ये त्यास गंभीर दुखापत होवुन मयत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जी.एस.देव ९५११२०००६६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ६९५/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-६५,रा.पाषाण,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०८/२०१९ रोजी २०/४५ वा. शिवालय सोसायटी गेट समोर साईचौक पाषाण,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे राहते घरी पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचेजवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन व मंगळसुत्र ९० हजार रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. (फिर्यादी यांची मनसिक स्थिती ठिक नसल्याने त्यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.बी.चव्हाणके ९९२१६७०००५ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २६७/१९,भादविक ४२०,४०६ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-६९,रा.कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०८/२०१९ रोजी १०/०० वा. फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हा फिर्यादी यांचे ओळखीचा असुन,त्याने फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून,घर बांधण्यासाठी फिर्यादी यांचेकडुन १५ लाख रूपये घेवुन,त्याबदल्यात पितळीचे सात पट्टया सोन्याचे आहेत असे भासवुन ते फिर्यादीस देवुन,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.व्हि.बुवा ९८२२२३६७२१ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ७६६/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३७,रा.आंबेगाव पठार,पुणे |
| **आरोपी** | ओबोटॉप इ-सर्व्हिस प्रा.लिमी. कंपनीचे अज्ञात दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०२/२०१९ रोजीचे दरम्यान मगरपट्टा हडपसर,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा ऑनलाईन फायनान्स देण्याचा व्यवसाय असुन,यातील नमुद ओबोटॉप ई-सर्व्हिस प्रा.लिमी. कंपनीचे इसमांनी,फिर्यादी यांना व्यवसायास करण्यासाठी तसेच ऑन लाईन सेवा देण्याचे अमिष दाखवुन,त्यांना वेळोवेळी बँकेत पैसे भरण्यास सांगुन,फिर्यादी यांची २,१८,२७०/- रू ची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे), एस.एस.शिंदे ८३८००७१९६२ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५३४/१९,भादविक ३४१,३५३,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | पो.शि. ए.एन.कोंडे, सिंहगड पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.किशोर राजेंद्र परदेशी,वय-३०,रा.परदेशी मळा,फुरसुंगी,पुणे २.कानसिंग अमरसिंग राठोड, वय-३४,रा.देवाची उरूळी,पुणे ३.विक्रमसिंग ईरसिंग राठोड,वय-२५,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०८/२०१९ रोजी २२/३० वा. मसाका हॉटेल समोर नवले ब्रीज जवळ,वडगांव-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांनी शासकीय कामासाठी नवले ब्रीजवर बोलाविल्याने ते त्यांचे मोटार सायकलवरून जात असताना,त्याचे पाठीमागुन ओरडण्याचा आवाज आल्याने,ते नमुद ठिकाणी थांबले असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादीस नीट गाडी चालविता येत नाही का असे बोलल्याने,फिर्यादी यांनी मी पोलीस असल्याचे सांगुन, त्यांना माफी मागितली असता,त्यांनी फिर्यादीस अपशब्द वापरून,ते सरकारी कर्तव्य बजाविण्यासाठी जात असताना,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.एस.एस.घाडगे ९४०३४४२०३३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**